# महान गुणग्राहक

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - अक्षरगंध, वर्ष ९ वे, दिवाळी २०१८, संपा. मधुवंती सप्रे, श्रीशब्दरत्न प्रकाशन, मुंबई, २०१८)

पु.लं.च्या आठवणी! त्या सांगणं एका अर्थाने अगदी सोपं आहे कारण त्यातल्या बऱ्याचशा लक्षात राहण्यासारख्या आहेत. पण तरीही त्या अवघडही वाटतात. कारण त्यातल्या काही गोष्टी शब्दात न पकडता येण्यासारख्या आहेत. स्वप्नासारख्या हवेत विरून जाव्यात तशा वाटतात त्या. प्रत्यक्ष कामाशी संबंध नसताना होणाऱ्या गप्पा, विचारांचं, अनुभवांचं आदानप्रदान हे सगळं कधी लिहून ठेवलं नाही. कारण ते फक्त आम्हा दोघांपुरतंच आहे असं वाटायचं.

पु.लं.ची प्रत्यक्ष ओळख होण्यापूर्वी त्यांच्या साहित्यातून मी त्यांना भेटलो होतो. भेटत होतो. १९६२ साली मी एम.ए. झालो. त्या काळात गिरगावात ब्राह्मण सभेत गाणं होत असे. राम मराठे, बेहरेबुवा, कुमार ह्यांचं गाणं असलं की श्रोत्यांमधे हमखास पु.ल. असणारच. सोबत दाजी भाटवडेकर, अनंतराव वर्तकही असत. मला वाटतं ते १९६४-६५ साल असावं. त्या काळात 'तुझे आहे तुजपाशी' आणि 'सुंदर मी होणार'च्या तालमी चालू होत्या. तालमी झाल्या की ही मंडळी गाण्याला येऊन बसत. मला तेव्हा आश्चर्य वाटायचं की हा एवढा मोठा साहित्यिक माणूस, ह्यांना संगीतात एवढी रुची कशी?

माझे गुरुजी म्हणत की एखाद्या माणसाला गाणं किती कळतं, ते तो कसं ऐकतो, ह्यावरून आपण सांगू शकतो. मी मग मुद्दाम पाहत असे की 'पु.ल. गाणं कसं ऐकतात'. माझं एक निरीक्षण असं होतं, ते म्हणजे पु.ल. समोर ऐकायला बसले तर गायकाला वेगळाच हुरूप गाताना येत असे. पु.लं.चा स्वभाव मनमोकळी दाद देण्याचा. उगाच आपले बसून आंबट चेहऱ्याने गाणं ऐकत आहेत असं कधीच दिसलं नाही. त्याबद्दल माझं एकदा निवृत्तीबुवा सरनाईकांशी बोलणं झालं, ते म्हणाले, "अहो, हे एक वेगळे घराणंच आहे. तुम्हाला सांगतो गोविंदराव टेंबेही असेच. ते कोल्हापूरला देवल क्लबात गाणं ऐकायला बसायचे. गाणं वाईट जरी होत असेल तरी टेंबे तारीफ करायचे. मी त्यांना एकदा विचारलं तर म्हणतात कसे, अहो, अशी तारीफ केली नाही तर आत्ता गातोय त्यापेक्षा वाईट गाईल ना तो. आता ऐकायला बसलोच आहोत तर काहीतरी बरं ऐकायला मिळेल ना. त्याला येतंय त्यातलंच बरं गाईल तो. म्हणून करतो तारीफ."

पु.लं.चाही तोच स्वभाव होता. मात्र गाणं संपल्यावर त्यांना त्याबद्दल विचारलं तर ते त्या गाण्याचं अगदी योग्य विश्लेषण करीत असत. नंतर मग मी संगीतावर लिहू लागलो. सुरुवातीला मी 'सत्यकथे'त लिहीत होतो. सत्यकथेचे वाचक कमी पण निवडक. नंतर 'महाराष्ट्र टाईम्स'मधे लिहायला लागल्यावर वाचकवर्ग वाढला. दोन्हीकडच्या लेखनावर प्रतिसाद चांगला मिळाला. मे. पु. रेगे, पु.ल. ह्यांनीही त्या लेखनाला दाद दिली. 'ह्याला गाणं कळतंय. बरं लिहितो हा.' अशी ती दाद होती. तिथूनच मग आमची ओळख झाली.

पु.लं.चं वैशिष्ट्य असं होतं ते म्हणजे ते कधीही एकटे वावरत नसत. साहित्य, नाटक, संगीत ह्या सगळ्या क्षेत्रातील सांस्कृतिक मंडळंच त्यांच्या सोबतीने वावरत आहेत असं वाटे. पु.लं.च्या व्यक्तिमत्त्वात चुंबकासारखं काहीतरी होतं. त्यामुळे लोक त्यांच्याकडे आपोआप ओढले जात. नेहरूंसारखेच तेही नेहमी लोकांच्यात रमत असत.

कोण कुणाकडे शिकतो, हे पु.लं.ना बरोब्बर माहीत असे. मुंबई विद्यापीठात संगीत केंद्र काढायचं ठरलं. पु.ल. सल्लागार समितीत होते. त्यांनी मला तिथे काम करायला बोलावलं. त्यावेळी मी ऑल इंडिया रेडिओवर ड्युटी ऑफिसर म्हणून होतो. त्या नोकरीचा इतर फायदा विशेष नाही झाला, पण मला पाश्चिमात्य संगीत मात्र पोटभर ऐकायला मिळालं. कारण रेडिओसुद्धा घरी उशिराच आला होता. ती सगळी ऐकण्याची भूक मी तिथे भागवली.

मुंबई विद्यापीठातले दिवस खरोखरच मंतरलेले होते. पु.ल., वामनराव देशपांडे, ढेकणे ही मंडळी सल्लागार समितीत होती. तिथे ती मंडळी नोकरी करत नव्हती एवढाच त्यांच्या माझ्यात फरक. पण आम्हा सर्वांच्या मनात कायम संगीताचा विचार. काम केलं ते अतिशय अनौपचारिक केलं. मनापासून केलं. हे काम माझं आहे का? हा विचार कुणाच्या डोक्यात येत नसे. कारण मुळात संगीत हा विषय कुणा एकाला पूर्णपणे कळेल असं आम्हाला कुणालाच वाटत नव्हतं. अगदी दुर्गाबाई भागवतसुद्धा आमच्या बैठकीत सामील होत कधीकधी.

पहिला रेकॉर्डिंग स्टुडिओ आला तो मुंबई विद्यापीठात. पण त्यावेळी लोकांना त्याची विशेष माहिती नव्हती. 'अशोकला एअर कंडिशन्ड हवेत बसायचं आहे, म्हणून हा स्टुडिओ काढलाय,' अशीच बऱ्याच लोकांची समजूत होती तेव्हा. कारण संगीतासाठी अशी काही सुसज्ज साधनं असतात ह्याची कल्पनाच नव्हती ना कुणाला. रेकॉर्डिंगसाठीही पैसा फार मिळत नव्हता आम्हाला. पण तरीही आहे त्या पैशात अधिकाधिक चांगलं काम करायचा आम्ही प्रयत्न केला. एकदा रस्त्यावरून एक माणूस 'रावणहथ्था' हे वाद्य वाजवत जात होता. 'दो आँखे बारह हाथ'मधे संध्याने ते वाद्य वाजवलंय त्याचं नाव 'रावणहथ्था'. मग मी त्या माणसाला स्टुडिओत बोलावलं आणि त्याचं वादन रेकॉर्ड करून घेतलं. पु.लं.नी ते वादन ऐकलं तेव्हा त्यांना खूप कौतुक वाटलं. तो त्यांचा स्वभावच होता. काही वेगळं बोललं तर ते कळणारा माणूस होता तो. त्यांच्या मदतीमुळे विद्यापीठात संगीताविषयी बरंच मूलभूत काम करता आलं आम्हाला.

मी विद्यापीठासाठी चांगली चांगली पुस्तकं मागवत असे. एकदा मी पुस्तकांची यादी दिली तेव्हा 'भारतीय संगीत केंद्र' असं नाव असताना पाश्चात्य संगीतावरची पुस्तक का घेतली जात आहेत? अशी शंका एका कारकुनाने उपस्थित केली होती. अशा तऱ्हेच्या मंडळीत राहून काम करू शकलो ते पु.ल., वामनराव इत्यादींच्या पाठिंब्यामुळेच. पु.लं.ना वेळ असला की आम्ही विद्यार्थ्यांना बोलावत असू. साऊंड लायब्ररीत नवीन काही आलं तरी पु.ल. यायचे. दरवर्षी विद्यापीठात बारा कार्यक्रम होत. सहा व्याख्यानं आणि सहा गाण्यांचे कार्यक्रम. अगदी मन्सुरांपर्यंत सर्व गायक केवळ बाराशे रुपये बिदागीवर आमच्याकडे गायला येत. तेव्हा श्रोत्यांमधे आमच्या विद्यार्थ्यांसोबत इतरही गायक असत. कारण संगीत हाच मुळी आम्हा सर्वांना जोडणारा एक समान धागा होता.

एथ्नोम्युझिकॉलॉजी जर्नल (Ethnomusicology journal) हे मासिक आम्ही मुंबई विद्यापीठात घेत होतो. डॉक्टर चितळे म्हणून एक प्लॅस्टीक सर्जन होते. त्यांनी वेगळया प्रकारची बासरी तयार केली. त्यासाठी त्यांना ॲकोस्टीक्सवरची पुस्तकं हवी होती. त्या पुस्तकांचे सहा खंड त्यांना आमच्या विद्यापीठातच मिळू शकले. कितीतरी लोक आपणहून आम्हाला दुर्मीळ रेकॉर्डिंग आणून देत असत. एकदा ग्वाल्हेरहून एक वयस्कर गृहस्थ आले, त्यांच्यापाशी कृष्णराव पंडितांचं रेकॉर्डिंग होतं, ते आम्हाला देऊन गेले. शिपिंग कॉर्पोरेशनतर्फे आम्हाला दरवर्षी रेकॉर्डिंगसाठी दहा हजार रुपये मिळत. दुर्गाबाई अचानक येत, म्हणत, 'अशोक, रास्त्यांच्या सुनेकडून अमकी अमकी ओवी लिहून आणली आहे. किंवा चिंधीच्या ओव्या मिळाल्या आहेत.' मग आम्ही ते रेकॉर्ड करीत असू. काहीतरी महत्त्वाचं आपण करीत आहोत तो आनंद त्यात होता.

अर्थात पु.ल. विद्यापीठाच्या सल्लागार समितीत तीनच वर्षं होते. तिथून ते दिल्लीला संगीत नाटक अकादमीत चेअरमन म्हणून गेले. पण तरीही आमचा पत्रव्यवहार चालूच होता. त्यात खंड पडलाच नाही. नवीन कल्पनांची चर्चा आम्ही करीत असू. कारण

'नाटक महत्त्वाचं, संगीत महत्त्वाचं!' अशी आमची धारणा होती. 'व्यक्ती महत्त्वाच्या नाहीत. काम महत्त्वाचं.' असं असल्यामुळे नव्या कल्पनांचं त्यांच्यापाशी नेहमीच स्वागत असे. संगीत नाटक अकादमीसाठी मग आम्ही 'ख्याल'वरती वर्कशॉप घेतलं. वेगवेगळी सेमिनार्स आयोजित केली.

आमच्या पत्रव्यवहारात संगीताविषयी आम्ही लिहीत असू, नाटकाविषयी लिहीत असू. नटांचे आवाज, बोलण्याची शैली, ध्वनिमुद्रणं, जुने कलाकार, नवे कलाकार अशा सगळया विषयांवर मनमोकळी चर्चा होई. त्यांची भूमिका निराग्रही असे. ते म्हणत, 'तुमचं पद्धतशीर शिक्षण झालं आहे त्यामुळे तुम्ही म्हणता ते अधिक बरोबर असेल. आम्ही तात्कालिक विचार करतो.' एवढा मनाचा मोकळेपणा पु.लं.पाशी होता.

पंधरा वर्षे काम केल्यानंतर मी मुंबई विद्यापीठाची नोकरी सोडली आणि अमेरिकन इन्स्टिट्यूटच्या एथ्नोम्युझिकॉलॉजी सेंटरमधे डायरेक्टर ह्या पदावर पुण्याला गेलो. तिथेही काम करताना पु.लं.शी संपर्क सतत होता. पण पुढे ती संस्था दिल्लीला गेली. मला काही दिल्लीला जायचं नव्हतं. मुंबई-पुणे ह्या पट्ट्यातच मला राहायचं होतं. त्या सुमारास पु.ल. एन.सी.पी.ए.चे डायरेक्टर झाले. मग त्यांनी मला तिथे बोलावलं. तिथपासून आमचा दररोजचा प्रत्यक्ष संबंध येऊ लागला. त्यांनी माझ्यासाठी एक खास रिसर्च पोस्ट तयार केली. पण सुरुवातीला रिसर्च करायचा कशावर? असा प्रश्न होता. सुरुवातीला आम्हाला अनुदान नव्हतं. बरं, रिसर्च करणं म्हणजे चार पुस्तकं वाचून पाचवं पुस्तक लिहिणं, ह्यात मला रस नव्हता. मग मी आणि पु.लं.नी विचार केला. कमी पैशात काही रिसर्च करता येईल का? तेव्हा आम्हाला एक छान विषय सुचला, संस्थानिकांच्या पदरी जे गवई होते, त्यांच्याबद्दल सर्व्हे करायचा. शंभर वर्षं हे कलाकार जगले कशावर? खरोखर हा विषय चांगला होता. मी तो घेणार एवढ्यात आम्हाला फोर्ड फाऊंडेशनची ग्रँटच आली. ती ग्रँटसुद्धा भरपूर म्हणजे त्या काळातले ८२००० डॉलर अशी होती. त्यामुळे तो विषय बाजूला पडला.

मग काय, आमचे आवडीचे विषय - संगीत, नाटक आणि संस्कृती. हे विषयही असे की कित्येक जन्म खर्ची घातले तरी त्यांचा तळ गाठला जायचा नाही. आमचं मुळी तत्त्वच बनलं - काम करा, भरपूर काम करा. कोणी कोणाच्या आड यायची गरज नाही. खरंतर एन.सी.पी.ए.सारख्या संस्था म्हणजे नुसते डोलारे. पण तिथे जे काम खरं व्हायला हवं होतं ते होत नव्हतं. नारायण मेनन ह्यांची इंदिरा गांधींशी चांगली ओळख. महाराष्ट्र सरकारने चांगली जागा दिली. संस्था उभारली गेली पण पुढे काय, रेकॉर्डिंगसाठी व्हॅन घेतली पण त्यांचं करायचं काय? असा मेननना प्रश्न पडे. महाराष्ट्र सरकारचे अनुदान आहे पण मराठीचं रेकॉर्डिंग काहीच झालं नाही. असं घडलं की ते माझ्याशी बोलायचे. मी त्यावेळी विद्यापीठात होतो. मग आम्ही कलाकार बोलावून घेऊन रेकॉर्डिंग करीत असू व ते संग्रहालयात ठेवत असू. मी स्वतःच एन.सी.पी.ए.त गेल्यावर दोन महत्त्वाचे प्रोजेक्ट केले. त्याचे सर्व पैसे फोर्ड फाऊंडेशनकडून आले. एन.सी.पी.ए.ला एक नवा पैसा द्यावा लागला नाही. संस्कृती आणि संगीत ह्यांचा आंतरिक संबंध असतो आणि संस्कृतीमुळे संगीत भरभराटीला येतं हे त्यामागचं मूलभूत तत्त्व आहे. हा विषय भारतात कुठेही समग्रपणे शिकवला जात नाही. मग आम्ही त्या विषयीची वर्कशॉप घ्यायचो. ही वर्कशॉप्स महिनामहिना चालायची. बंगलोर, दिल्ली, मुंबई अशी आम्ही वर्कशॉप घ्यायचो. पु.लं.शी चर्चा करता करता आमच्या लक्षात आलं की नाटकाच्या सर्व अंगांकडे प्रत्यक्ष बघायला मिळेल अशी कुठे जागाच नाहीये. पुस्तकी ज्ञानावर किती अवलंबून राहायचं? मग आम्ही नाटकांची वर्कशॉप घेतली. स्वतः पु.लं.नी त्या वर्कशॉपमधे करण्यासाठी म्हणून नाटक लिहिलं. 'एक झुंज वाऱ्याशी'. ह्या वर्कशॉपमधे वामन केंद्रे, दिलीप प्रभावळकर, अंजन श्रीवास्तव, चेतन दातार असायचे. वर्कशॉपमधे रंगभूमीवरील गद्य, पद्य, अभिनय, गायन ह्या सर्वांवर चर्चा करायची आणि त्या चर्चेचं फलित म्हणून मग नाटकही करून घ्यायचं अशी योजना आम्ही आखली.

पु.लं.ना कुठल्याही भाषेचं वावडं नव्हतं. मराठीबरोबर गुजराती, बंगाली, इंग्रजी रंगभूमीला आमच्या इथे मुक्तद्वार होतं.

कुणीही आला तरी पु.लं.कडे त्यांच्या नव्या कल्पनांचं स्वागत असे. सर्वांनी मिळून चर्चा करून कार्यक्रम आखला जाई. मग आम्ही मराठी नाट्यसंगीत, बैठकीच्या लावण्या असे वेगवेगळे कार्यक्रम केले. पु.ल. आणि मी स्वतः त्या कार्यक्रमाचं निरूपण करीत असू. पु.ल. खूपच हजरजबाबी होते. वयाने, मानाने मला ज्येष्ठ होते. पण निवेदन करताना आमची समान पातळी असे. एकमेकांना पूरक असे नर्म विनोद केल्याने श्रोत्यांनीही ते कार्यक्रम अगदी डोक्यावर घेतले. असे ते कार्यक्रम दिलखुलास होते.

'बैठकीची लावणी' हा कार्यक्रम मी अमेरिकन इन्स्टिट्यूटमधे प्रथम केला होता. शेखर खांबेटे ह्या माझ्या शिष्याने त्याची कॅसेट आधी काढली. कॅसेट ऐकल्यावर आम्हाला वाटले की ह्याचे कार्यक्रमही व्हायला हवेत. मग आम्ही तो कार्यक्रम एन.सी.पी.ए.त केला. अभंग, भक्तिगीतांचा 'देवगाणी' हा देखील एक छान कार्यक्रम आम्ही केला. त्यावेळी वेगवेगळया भजनी मंडळातील कलाकारांचं गाणं मी ऐकत असे आणि नंतर पु.लं.ना ऐकवत असे. मारुतीबुवा बागडे, शिवरामबुवा वरळीकर असे बरेच चांगले गायक आम्हाला त्यात मिळाले. शिवरामबुवा हे कोळी समाजातील. ते स्वभावानेही थोडे बुजरे होते. पण तालमीला पु.ल. बसले की सगळयांना अगदी मोकळं वाटे. 'अरे हा आपल्यातलाच माणूस!' अशी त्यांची लगेच भावना होई.

तालमीतून वेगवेगळ्या कथा निघत. आणखी नवा नवा कार्यक्रम सुचे. कौसल्याबाईंची लावणी 'नका टाकून जाऊ, डावा डोळा पाण्यानं की हो भरला' ही आम्हाला तिथेच सापडली. मग बैठकीच्या लावणीच्या कार्यक्रमात भैरवी म्हणून तीच लावणी आम्ही घेतली.

एन.सी.पी.ए.तला काळ हा आमच्या आयुष्यातला प्रसन्न काळ होता. पण तसं पाहिलं तर पु.लं.ची तब्येत तेव्हा ठीक नसे. त्यांना चालायला सांगितलं होतं. ते चालताना दिसले की मी अभिनंदन करीत असे. त्यावर ते म्हणायचे, 'काय अशोक, अगदीच कंटाळवाणा प्रकार आहे हा. ज्या रस्त्याने जायचं, त्याच रस्त्याने परत यायचं म्हणजे काय, छे!'

ते नेहमी म्हणत आपल्या तब्येतीबद्दल दुसऱ्याला कधीच सांगू नये. कारण दुसऱ्याला ते ऐकून वाईट वाटतं आणि आपल्याला तर वाईट वाटत असतंच. पण आम्हाला जाणवायचं की त्यांना जे आवडतं ते करण्यासाठी ते फार मोठी किंमत देत आहेत. त्याच काळात म्हणजे १९८२-८३ सालापासून त्यांना व्याधी सुरू झाली. तशी काळजीदेखील ते फारशी घेत नसत.

आम्ही कार्यक्रम एन.सी.पी.ए.ला करायचो. त्याला भरपूर प्रसिद्धी मिळत असे. लोक म्हणत, बाहेरही हे कार्यक्रम करा पण आम्हाला तसं करायचं नव्हतं.

पु.लं.नी एन.सी.पी.ए.ला नवीन चेहरा दिला. कारण त्यांच्याकडे कलाकारांना एकत्र आणायची ताकद होती, त्यांना 'vision' होती. पण त्यांच्या सोबतची इतर सरकारी माणसं तशी नव्हती. सरकारने पैसा दिला, जागा दिली. आता नारायण मेननंनी बोलावल्यावर रविशंकर येतीलच हो! पण त्यांना बोलावलं की झालं, एवढयासाठीच संस्था नसतात. त्यांच्या खालीसुद्धा बरीच माणसं असतात, त्यांचं काय? आम्हा सगळयांना पु.लं.मुळे एक दृष्टी मिळाली, संपन्न अनुभव मिळाला. सचिन खेडेकर वगैरे आजचे नामवंत त्या सुंदर दिवसांची अजूनही आठवण काढतात.

पु.लं.ची कदाचित त्या ठिकाणी थोडी कुंचबणाही झाली असेल. कारण संस्थेचे किचकट नियम पाळावे लागत होते. पण प्रसंगी नियमांना मुरडही घालायला पु.ल. मागेपुढे पाहात नसत. कारण कला आणि कलाकार ह्यासंबंधी कार्य करणारी संस्था अशी एकदम ताठर राहू शकत नाही.

माझ्या बाबतीत म्हणायचं झालं तर मी काय म्हणतो आहे ते पु.लं.ना चटकन समजत असे. अशी आमची वेव्हलेंथ जुळली होती. काही वेगळं बोललं तर ते समजणारा तो माणूस होता. लोकांना चांगलं दिलं तर ते हवं असतं ते आम्हाला ठाऊक होतं.

मुंबईत दंगली झाल्या तेव्हा आमचा 'देववाणी' हा कार्यक्रम चालू होता. त्या काळात लोक सांगत, 'मुंबईत हे जे काही निरर्थक चाललं आहे त्यात अर्थपूर्ण अशी एकच गोष्ट आहे आणि ती म्हणजे तुमचा हा कार्यक्रम.'

सरकारने 'हक्सर कमिटी'ला अशा सर्व संस्थांची तपासणी करण्यासाठी नेमली. त्यांचं म्हणणं असं होतं की ह्यात वेळ फार जातो. त्यांनी मला ह्या विषयावर मत मांडायला बोलावलं. मी त्यांना सांगितलं की संस्था गजगतीने चालतात. माणूस त्याच्या वैयक्तिक आनंदासाठी काम करतच असतो. तुमचा पैसा मिळो न मिळो. तो काम करणारच. पण तुम्ही त्याला मदत केलीत तर त्याचं काम लवकर होईल आणि तुमचंही काम लवकर होऊन संस्था उभारणीचा उद्देश सफल होईल. संस्था नुसत्याच काढून उपयोग काय? त्यात प्राण फुंकणारी माणसंच तर असतात. आणि पु.ल. तसे होतेच. नाटक, चित्रपट, संगीत, काव्य, आणि संस्कृती हे विषय त्यांच्या जिव्हाळ्याचे होते. गुणवत्ता - मग ती जिथे असेल तिथून ती उचलायची. मदतीची गरज लागली तर मदत मागायची आणि लोक ती मदत करतदेखील असत. पु.ल. हे 'प्रशासक' म्हणून एकदम महान नसतील पण ते 'गुणग्राहक' म्हणून नक्कीच महान होते असं मी म्हणेन.

---